अशीही घुसखोरी

"केवळ मराठीत बोलण्याची स्पर्धा"
स्पर्धेचा नियम : 'दुसऱ्या कुठल्याही भाषेचा एकही शब्द न वापरता तीन मिनिटे बोलावे.'

हा नियम पाळणं कुणालाही कठीण जाणार आहे. सध्याच्या मराठीत 'मिनिटे' या शब्दासकट इतर अनेक शब्द परक्या भाषांतून उचलून आणलेले आहेत. ते सगळे वगळून बोलणं अस्सल पुणेकरांनाही कठीण जाईल.
त्या उचललेल्यांपैकी बऱ्याच शब्दांवर, 'मिनिटे', 'टेबलावर' असा बहुवचनाचा, विभक्तिप्रत्ययांचा मराठी साज सहजपणे चढतो. 'व', 'वगैरे', 'सैल' यांसारखे शब्द मूळचे मराठी नाहीत हे सांगूनही खरं वाटत नाही. ते मराठीशी एकजीव झाले आहेत. त्यामुळे एकेकाळची नऊवारीतली मायमराठी हे नवे दागिने लेऊन आता पाचवारीत किंवा पंजाबीत वावरते आहे. तरीही ती आईच आहे. त्या नव्या लेण्यांनी तिचं रूप खुललं आहे.
पण स्पून, लायन, स्टेप यांची अनेकवचनं स्पून्स, लायन्स, स्टेप्स अशी इंग्रजीच होतात; त्यांची स्पूनाला, स्टेपेवर अशी सामान्यरूपं होत नाहीत; त्यांचे मराठी प्रतिशब्द थोड्याशा विचाराने आठवतात. असे परके शब्द त्याच अर्थाचे मराठी प्रतिशब्द डावलून वापरू नयेत.

काही शब्द कॉलेज-कट्ट्यांवर जन्मतात. प्रत्येक कट्ट्यावरचे नवजात शब्द वेगवेगळे असतात. ते एकमेकांत सांकेतिक म्हणून वापरणं ठीक आहे. पण ते औपचारिक लिखाणात न वापरण्याचं भान हवं.
"मी जेव्हा एखादा शब्द वापरतो तेव्हा त्याचा अर्थ काय असावा तेही मीच ठरवतो!" ॲलिस-इन-वंडरलँडमधला हम्प्टी-डम्प्टी म्हणाला. तशी आजकालची मंडळी 'नमतं' या अर्थाने 'निमुळतं', 'तलफ'च्या ऐवजी 'लकब' असा कुठलाही शब्द कुठल्याही वेगळ्याच अर्थाने वापरताना दिसतात. यात नवनिर्मिती नसते; निष्काळजीपणा असतो. भाषेचा जन्म संवाद साधण्यासाठी झाला. प्रत्येकाने आपापल्या शब्दांचे वेगवेगळे अर्थ ठरवले तर संवाद साधणं अशक्य होईल.

कालपरत्वे भाषा बदलत जाते; नव्या शब्दांची आवक होऊन ती अधिक समृध्द होते. पण त्यासाठी तिचा कणा, म्हणजेच तिचं स्वतःचं व्याकरण, शब्दरचना आणि वाक्यरचना मजबूत टिकायला हवी. व्याकरण भाषेच्या शुध्दीचे निकष ठरवतं; तिला प्रमाणित करतं.
बोलणाऱ्यांच्या निष्काळजीपणाने 'मी आले'चं 'मी आली' झालं. मायमराठीने तेही खपवून घेतलं. अलीकडे बोलण्यात 'तू माझी मदत करशील?' 'मी त्याच मुद्द्याला घेऊन विचार करतो आहे' अशा परक्या शब्दरचना घुसल्या आहेत. 'मी तेव्हाही सुंदर दिसेन जेव्हाही तू मला बघशील' या वाक्यरचनेतला क्रम मराठी नाही. तिचा बाज इंग्रजीचा आहे. त्रिनिदादसारख्या छोट्या देशात बाहेरून आलेल्या भाषांनी मूळ भाषेचं व्याकरण मोडून तिला संपवून टाकलं.

केवळ निष्काळजीपणाने आपणही आता मराठीच्या गाभ्याला धक्का पोचवत आहोत. भाषा ही विचारांचं केवळ वाहन नसून जननीसुध्दा असते. भाषेत निष्काळजीपणा केला की विचारही अव्यवस्थित होतात. वर्तनाचं वळण बिघडतं. आपल्या मराठी बाण्याचं वळण जिने आजवर टिकवलं त्या मायमराठीची निदान तेवढ्यासाठी काळजी घ्यायला हवी.

डॉ. उज्ज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com

('esakal' च्या सौजन्याने)